<u>आपल्या सर्वांचे स्वप्न</u>
<u>मलबार हिल</u>
<u>राहण्याचे एक आदर्श स्थान</u>
<u>माझे वचन</u>
<u>भाजपा सरकारच्या मार्गदर्शनात</u>
<u>हे स्वप्न सत्यात उतरवणारच</u>

*- मंगल प्रभात लोढ़ा*

<u>बोलत नाही, करुन दाखवितो</u>

Vote for BJP
on Wednesday, 15th Oct.



श्री मंगल प्रभात लोढा त्यांचे स्फूर्तीस्थान श्री नरेंद्र भाई मोदी समवेत

## आपला आमदार

श्री मंगल प्रभात लोढा हे न्यायमूर्ती कै.गुमानमल लोढा यांचे सुपुत्र आहेत. गुमानमलजी आसाम उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश होते तसेच भारतीय प्राणी कल्याण संस्थेचे अध्यक्ष होते. ते तीन वेळा पाली, राजस्थान येथून खासदार म्हणून निवडून गेले.

मंगलप्रभात लोढा लहानपणापासूनच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी जोडले गेले आहेत. सशक्त अर्थव्यवस्था आणि राष्ट्राची अंतर्गत सुरक्षा हे त्यांचे विशेष आवडीचे विषय आहेत. त्यांनी आपले बी.कॉम आणि एलएल.बी. जोधपूर येथून केले आणि नंतर वकील म्हणून काम सुरु केले.जेव्हा त्यांचे वडील राजस्थान उच्च न्यायालयाचे न्यायाधीश बनले तेव्हा हितसंबंध आड येऊ नयेत म्हणून त्यांनी वकीली सोडली आणि मुंबईला आले. अत्यंत कमी अशा आर्थिक ताकतीवर पण कठोर परीश्रमाने त्यांनी आपला व्यवसाय वाढविला. २००५ नंतर त्यांच्या मुलांनी व्यवसायात लक्ष घातले आणि मंगलप्रभात लोढा यांनी आपला बहुतांश वेळ राजकारण आणि समाजकारण करण्यात घालविला. आपले आमदार म्हणून कार्यरत असतानाच ते भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्राचे उपाध्यक्ष आणि All India Business Council (AIBC) चे अध्यक्ष आणि शहीद गौरव समितीचे संयोजक म्हणूनही  कार्यरत आहे.

# जर भारत भाजपा सरकारच्या कार्यकाळात प्रगतीपथावर जात आहे तर महाराष्ट्रानेच मागे का रहावे ?

गेली अनेक वर्षे केंद्र सरकार मुंबईकडे एक कर गोळा करणारी दुभती गाय म्हणूनच पाहत आहे आणि त्यामुळे मुंबईच्या सुदृढ वाढीसाठी आणि मुंबईकरांच्या अपेक्षांकडे कायम दुर्लक्षच केले गेले. बऱ्याच पक्षांनी आपल्या राज्यात सत्ता उपभोगली पण भ्रष्टाचार आणि पोकळ आश्वासने ह्यांच्यापेक्षा आपल्या पदरी काहीही पडले नाही. श्री नरेंद्र भाई मोदी यांच्या मार्गदर्शनाखालील सरकारने, अत्यंत कमी कालवधीत प्रगतीशील आणि प्रखर इच्छाशक्ती असलेले सरकार किती कार्य करु शकते ते दाखवून दिले आहे. आता आपल्याला महाराष्ट्रात श्री नरेंद्र भाई मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपा सरकार आणण्याची आणि मुंबईला पुन्हा श्रेष्ठत्व देण्याची सुवर्णसंधी चालून आली आहे.

मलबार हिलच्या प्रगतीसाठी आपण कॉँग्रेस सरकार आणि महानगरपालिका दोघांशीही लढलो, पुढेही गेलो पण महाराष्ट्रात भाजपा सरकार येताच केंद्रातील सरकार ह्यांच्या समन्वयाने मुंबईसाठी खूप काही करता येईल. ह्याचे पहिले पाऊल म्हणून आपल्या सूचनांनुसार आम्ही एक ७ कलमी कृती योजना आखली आहे ज्यायोगे मलबार हिल हे राहण्यासाठीचे एक आदर्श स्थान म्हणून बघितले जाईल.

ही योजना प्रत्यक्षात साकारण्यासाठी मी आपल्या अखंड सहकार्याची अपेक्षा ठेवत आहे अर्थात हे मलबार हिलला एक जागतिक नकाशावर स्थान देण्यासाठीच्या मोठ्या योजनेचा एक छोटासा भाग आहे आणि हे साकारण्यासाठी मला आपल्या डोक्यातल्या कल्पनांची आवश्यकता आहे. कृपया आपल्या कल्पना / सुचना मला /MP Lodha किंवा @MPLodha पाठवा.

भाजप सरकारच्या नेतृत्वाखाली
मलबार हिलची प्रगती करण्यासाठी
माझी दूरदृष्टी योजना पाहण्यासाठी स्कॅन करावे.



**मंगल प्रभात लोढा**

# 1 व्यापार आणि रोजगारात वृद्धी

बेसुमार कर, जाचक परवाना पद्धती, जकात, एलबीटी आदींमुळे व्यापारउद्योग आता मुंबईत वाढत नाही त्यामुळे रोजगाराच्या संधीही उत्पन्न होत नाहीत.

तात्काळ उपाययोजना :

अ) एलबीटी सारखा कोणताही नवा कर न लादता जकात रद्द करणे.

ब) सर्व प्रकारचे कर रद्द करुन जीएसटी सारखी एकच करप्रणाली लागू करणे.

क) आधीच्या सर्व कर देयकांवर एका वेळेची माफी योजना ज्यामुळे सरकारी याचिकातुन मुक्त होऊन व्यापार मुक्तपणे करु शकतील.

ड) व्यावसायिक प्रशिक्षणासाठी विशेष निधी उपलब्ध करणे ज्यामुळे कुशल मनुष्यबळ उपलब्ध होईल.

इ) शिक्षण खात्याच्या समन्वयाने व्यावसायिक प्रशिक्षणाचा शालेय आणि महाविद्यालयीन अभ्यासक्रमात समावेश करुन तरुण पदवीधरांची क्षमता वाढवून त्यांना रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध करणे.

फ) शासकीय कार्यालयांची व्यवसायातील दखल अंदाजी कमी करणे ज्यामुळे कमी भांडवलात व्यवसाय करणे शक्य होईल.



कृपया करुन आपण आपले मत भाजपाला द्या

3 | Mangal Prabhat Lodha

# 2 रस्ते आणि वाहतुकीत सुधारणा

मुंबईतील बरीचशी वाहनांची वाहतूक मलबार हिल मधून होते, ज्यामुळे वाहतुकीत खोडा उत्पन्न होतो आणि पर्यायाने पर्यावरणास हानी पोहोचते.

तात्काळ उपाययोजना :

अ) वरळी ते नरिमन पॉइन्ट सागरी मार्गाची जोडणी करण्याचे काम पूर्ण करणे आणि तो पुढे पूर्वमुक्त (इस्टर्न एक्सप्रेस) मार्गास जोडने यामुळे रिंग रोड ची निर्मिती शक्य होऊन वाहतूक मलबार हिलच्या बाहेरुन वळवता येईल.

ब) हँगींग गार्डन ते बॅन्ड स्टॅण्ड चौपाटी ह्या अलीकडेच मंजूरी मिळालेल्या सिरी रोडची २०१५ पर्यंत निर्मिती करणे.

क) वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी हाजी अली येथे उड्डाणपुलाची निर्मिती.

ड) बाणगंगा येथील रॉकी हिल रोड खुला करणे आणि त्यांचे रुंदीकरण करणे.

इ) हँगींग गार्डन ते केम्प्स कॉर्नर रस्त्याचे रुंदीकरण करुन दुहेरी वाहतूक सुरु करण्याच्या शक्यतेचा विचार

फ) व्यावसायिक वाहने / बसेस रस्त्यावर उभी करावयास बंदी ज्यामुळे नागरिकांना खासगी वाहने उबी करण्यास अधिक जागा उपलब्ध होईल.



ग) डी वॉर्ड (नाना चौक), आरटीओ कंपाऊंड (ताडदेव), राज भवन येथे नवीन वाहनतळ उभारणे

कृपया करुन आपण आपले मत भाजपाला द्या

3 | Mangal Prabhat Lodha

# 3 विद्यार्थ्यांच्या १०,००० नवीन शालेय प्रवेशाच्या संधी:

मलबार हिल मध्ये बऱ्याच शाळा आयबी किंवा तत्सम शाळात रुपांतरीत केल्या गेल्या आहेत. ह्या शाळांच्या बेसुमार शुल्कवाढीमुळे बऱ्याच पालकांना आपल्या पाल्यास माफक शुल्कात चांगल्या शाळेत प्रवेश घेणे कठीण होऊन बसले आहे.

तात्काळ उपाय योजना :

अ) ५ बंद/पुर्ण क्षमतेचा वापर नसलेल्या शाळा निश्चित केल्या गेल्या आहेत ज्या आयसीएससी/एसएससी शाळात रुपांतरीत केल्या जातील ज्यामुळे आपल्या विभागात १०,००० नवीन प्रवेश विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध होतील. ह्या शाळांमध्ये शारदा विद्या मंदिर (गावदेवी), जनता नगर शाळा (ताडदेव) आणि जगन्नाथ शंकर शेठ शाळा (नाना चौक) अंतर्भूत आहेत.

ब) ह्या शाळा १५ मिनिटांच्या वाहतुकीच्या अंतरातील विद्यार्थ्यांना प्राधान्य देतील.

क) सध्या सुरु असलेल्या शाळा इतर कुठल्याही कारणासाठी रुपांतरीत होण्यापासून रोखण्यासाठी विशेष कायदा आणला जाईल.



कृपया करुन आपण आपले मत भाजपाला द्या

3 | Mangal Prabhat Lodha

4

# मलबार हिल भयमुक्त आणि सुरक्षित करणे

चोरीमारी आणि घरगुती नोकरांकडून घडणारे गुन्हे यांचे वाढलेले प्रमाण आणि शहराच्या इतर भागात घडत असलेले बलात्कारासारखे भयंकर गुन्हे, वाहनचालकांकडून रस्त्यावर घडणारे अपराध वाढतच आहेत.

तात्काळ उपाययोजना:

अ) सार्वजनिक ठिकाणे आणि रस्ते येथे आधुनिक अशा एलईडी प्रकाश योजने मार्फत अतिरिक्त प्रकाश व्यवस्था करणे (ब्रीच कॅन्डी येथील सिल्वर ओक येथे प्रायोगिक तत्वावर सुरु करण्यात आली आहे).

ब) पोलिस चौकीतून निगराणीत प्रमुख सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही मार्फत बारकाईने पाहणी

क) घरगुती नोकरांची पोलिसांकडून शहानिशा आणि सहकारी संस्थांना हे करण्यास बंधनकारक करणे

ड) पोलिस आणि खाजगी संस्थेच्या देखरेखीत चोवीस तास मदतीसाठी संपर्क

इ) विभागातील इमारतींमध्ये नलीकेद्वारे गॅस पुरवठा ज्यामुळे सिलेंडर सारख्या धोक्यांना टाळता येईल आणि मॉन्ट ब्लँक सारखी दुर्घटना टाळता येईल.

फ) प्रत्येक आठवड्याला सहकारी संस्थांना विविध तज्ञांद्वारे व्यवस्थापन, सुरक्षितता आणि सरकारी कार्यालयांशी साधावयाच्या संपर्कात मदत करण्यात येईल आणि कन्वेयंसमध्ये सहकार्य केले जाईल.



ग) ज्येष्ठ नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने कायदे बनविण्यात येतील.

कृपया करुन आपण आपले मत भाजपाला द्या

3 | Mangal Prabhat Lodha

# 5 निसर्गाचे संरक्षण आणि संवर्धन

अनिर्बंध वाहतूक, योजनाशुन्य विस्तार आणि इतरही कारणांमुळे पर्यावरणाची प्रचंड हानी होत आहे.

तात्काळ उपाययोजना:

अ) हवेची शुद्धता मापणारी यंत्रणा प्रमुख वाहतूक नाक्यांवर लावणे आणि ती माहिती जनतेस उपलब्ध करणे.

ब) सौर उर्जेवर चालणारी विद्युत उपकरणे रस्त्यावर लावणे.

क) सार्वजनिक ठिकाणी गरम पाणी आणि प्रकाश योजनेसाठी सौर उर्जेचा वापर करणाऱ्या इमारतींना अनुदान

ड) एएलएमएसच्या पुढाकाराने पावसाच्या पाण्याची साठवणूक आणि त्याचा पुनर्वापर

इ) मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण

फ) उपरोक्त उपायांची चर्चा केल्याप्रमाणे वाहतुकीत कपात करणे ज्यामुळे प्रदूषण कमी होईल.



कृपया करुन आपण आपले मत भाजपाला द्या

3 | Mangal Prabhat Lodha

# 6 भाडेकरुंच्या चाळींचा योग्य वेळेत पुनर्विकास आणि सहकारी संस्थांना अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक (एफएसआय)

भाडेकरुंच्या चाळींचा पुनर्विकास अत्यंत कूर्मगतीने होत आहे आणि भाडेकरुंना विविध समस्यांना तोंड द्यायला लागत आहे. जुन्या इमारती (३० वर्षांपेक्षा जुन्या) यांना तर इमारतीच्या ढासळत्या परिस्थितीमुळे अधिकच त्रास सहन करावा लागतो आणि सरकारच्या निष्क्रिय धोरणांमुळे वाढीव चटईक्षेत्र निर्देशांक (जसा टीडीआर हा उपनगरातील इमारतींच्या पुनर्विकासासाठी उपलब्ध होतो) प्राप्त होत नाही.

तात्काळ उपाययोजना:

अ) भाडेकरुने संमती दिल्यावर ५ वर्षात पुनर्विकास न करणाऱ्या विकासकांवर जबर दंड आकारण्यासाठी डीसीआर ३३(७) आणि ३३(९) मध्ये बदल करुन हे अनिवार्य करणे विकासकाने प्रस्ताव सादर केल्यावर ९० दिवसांत कालबद्ध परवानगी

ब) जुन्या चाळी आणि सहकारी संस्था (३० वर्षांपेक्षा जुन्या) ह्यांना पुनर्विकासासाठी २.५ किंवा अधिक एफएसआय ज्यायोगे पुनर्विकास करणे शक्य होईल.

क) जुन्या इमारतींच्या दुरुस्तीच्या खर्चात सरकारचा वाटा वाढवणे – ५० वर्षे जुन्या इमारतीत २५% तर ७५ वर्षे जुन्या इमारतीत ५०% वाढवणे.

ड) मोकळया जागेची अट छोट्या प्लॉटसाठी शिथील करणे.



इ) सरकारला निवेदन – जुन्या चाळीत एफएसआय मुक्त संलग्न संडास बांधण्यास परवानी द्यावी.

फ) भाडेकरुंच्या हिताचा प्रमाणबद्ध विकासक – भाडेकरु करारनामा सरकारमार्फत प्रसारित करणे.

ग) म्हाडा अधिकारी आणि कायदा विभागाचे वकिल मासिक तत्वावर तक्रार निवारणार्थ मलबार हिलमध्ये उपलब्ध होतील.

ह) आरटीओ ताडदेव ते विल्सन कॉलनी रोडच्या प्रस्तावित रस्ता रुंदीकरणात कमी करुन पारसी अग्यारी लेन वाचविणे आणि इतर इमारतींचा पुनर्विकास शक्य करणे.

# 7 नागरीकांच्या सहभागाने जागतिक दर्जाच्या मोकळया जागांचे व्यवस्थापन

आपल्या भागातील मोकळया जागा विविध राजकारण्यांच्या ताब्यात आहेत. काही वर्षापूर्वी तर ते रेसकोर्सवर बांधकाम करायला निघाले होते. मोकळया जागांचे संरक्षण हा माझा अत्यंत जिव्हाळयाचा प्रश्न आहे.

तात्काळ उपाययोजना :


अ) अश्या मोकळया जागांच्या विकासासाठी आणि व्यवस्थापनासाठी विशेष सरकारी मदत दिली जाईल.

ब) कुठलीही मोकळी जागा एका परिवाराच्या व्यवस्थापनाच्या अखत्यारीत ठेवू दिली जाणार नाही. व्यवस्थापन समितीतील किमान ५०% सदस्य हे त्या जागेपासून १० मिनिटांच्या अंतरातील राहणारे असतील.

क) मुंबई सेंट्रल स्थानकाजवळ ऑलिम्पिक पात्रतेचा जलतरण तलाव आणि अवाढव्य बागेची निर्मिती.

ड) प्रियदर्शनी पार्क मध्ये ऑलिम्पिक पात्रतेच्या जलतरण तलावाची निर्मिती

इ) बॅन्ड स्टॅण्ड चौपाटीजवळील समुद्रकिनारा स्वच्छ आणि असामाजिक तत्वांपासून मुक्त करणे ज्यामुळे नागरीक समुद्री सौंदर्याचा आनंद लुटू शकतील.



प) जागतिक दर्जाचे मैदान म्हणून वसंतराव नाईक उद्यान (ताडदेव) याचे वर्षभरात काम पूर्ण करणे.

कृपया करुन आपण आपले मत भाजपाला द्या

3 | Mangal Prabhat Lodha

# भाजपाचे महाराष्ट्रातील सक्षम नेतृत्व



श्री. नितीन गडकरी



श्री देवेंद्र फडणवीस



श्री एकनाथ खडसे



श्री विनोद तावडे



श्री सुधीर मुनगंटीवार



श्रीमती पंकजा मुंडे

कृपया १५ ऑक्टोबरला मतदान करा
आणि मंगलप्रभात लोढा यांना विजयी करा

3 | Mangal Prabhat Lodha

To know more, log on to mangalprabhatlodha.com or
facebook.com/MPLodha or to @MPLodha

Printer: Jagruti Publisher: Prashant Dani. Qty: 20000